# गारुषण

विनीता देशपांडे



# पारूषण

## हे पुस्तक विनामूल्य नाही

## देणगी मूल्य रु. २१/-

## पेमेंटची माहिती शेवटच्या पानावर दिली आहे.

## पूर्ण पुस्तक वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : संकलकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल व ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा+, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पारूषण

विनीता श्रीकांत देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# पारूषण

## लेखिका : विनीता श्रीकांत देशपांडे

फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४
मो.नं. ७०५७५७४२७२/ 7218350078
मेल- vsdeshpande14@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क संकलकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संकलकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन : ५ मे २०२०

**मूल्य : २१ रु.**

©esahity Pratishthan®2020

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी

**ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.**



विनीता श्रीकांत देशपांडे
एम.ए.(मराठी), एम.ए(इंडॉलॉजी)

विनीताजींच्या प्रतिभेचा आवाका कथा, कविता, कादंबरी, समिक्षा लेखन, आकाशवाणी पुणेकेंद्रावरून काव्यवाचन, अनेक मासिक, दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांसाठी लेखन असा व्यापक आहे. "स्मृत्पर्ण" या ई-साहित्य प्रकाशित पहिल्या कादंबरीवर वाचकवर्ग आपल्या प्रतिक्रिया पाठवत आहेत. ई- साहित्य प्रकाशित "मराठी कवितेच्या पाऊलखुणा" इ.स.हे सन १८०० ते सन१९०० याकाळातील कवी आणि त्यांच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे. ई साहित्यतर्फ़े त्यांच्या फ़ुल्लारी ,रंगीला रे, अभ्यंतर आणि मण्यांची टोपी याही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या या पाचही कादंबऱ्या वेगळया विषयांवरच्या आणि वेगवेगळया घाटाच्या आहेत.

आगामी साहित्य- "भवताल" कथासंग्रह, आधुनिक मराठी कवितेच्या पाऊलखुणा(इ.स. १९००च्या पुढचा काव्यप्रवास). वाचकांच्या उदंड आग्रहावरून स्मृत्पर्णचा उत्तरार्ध

विनीताजींचे कार्यक्षेत्र केवळ लेखनापुरते मर्यादित नसून त्या होप ऍन्ड हॅप्पीनेस फाँऊंडेशनची संस्थापक आहेत, तसेच अनेक सामाजिक उपक्रम ई-कचरा संकलन, गरजूंसाठी शालेय साहित्य संकलन, वृद्धाश्रमासाठी उपक्रम, विशेष मुलांसाठी उपक्रम, 10000books.in ची एन.जी.ओ.पार्टनर असा विविधांगांनी पसरलेला आहे. त्यांनी संपादित केलेले विरासत या नियतकालिकाचे अंक ई साहित्यच्या ई नियतकालिक विभागात वाचता येतील.

संपर्क- फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४
मो.नं. ७०५७५७४२७२
मेल- vsdeshpande14@gmail.com


















- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/paoolkhuna_vinitadeshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/smrutparn.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/fullari_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/rangeela_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/abhyantar_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manyachi_topi_vinita_deshpande.pdf

# अर्पणपत्रिका

**देह अनित्य आत्मा नित्य। हाचि विवेक नित्यानित्य।**
**अवघें सूक्ष्माचें कृत्य। जाणती ज्ञानी॥**
**(दासबोध १३:१:२३)**

**सृष्टीतील आत्मतत्वास ही कृती समर्पित**

# पारुषण

विनीता शिंगारे (देशपांडे)

# मत्स्यकन्या

## १.

सातारा-कोल्हापूरचा कार्यक्रम आटपून मुंबईच्या एका आर्ट गॅलरीची स्टोरी कॅमेऱ्यात बंदिस्त करून उदयन मुंबई एयरपोर्टवर पोहचला तेव्हा त्याला तो दमला असल्याची जाणीव झाली. लाऊंजमध्ये कोचवर सामान भिरकावून तो फ्रेश झाला आणि वाफाळलेल्या कॉफीचा घोट घेताच चैतन्याची सरसर अंगभर फिरु लागली. त्याच्या आयुष्याच्या प्रवासातील थांब्यावर तो क्षणभर विसावला. कालचे...परवाचे....नेहमीचे झटकून टाकलेले नकोनकोसे विचार त्या देहात परत रुंजी घालू लागले. कॉफीच्या वाफेच्या वलयात ते विरून जातील या आशेत काहीवेळ तो स्तब्ध बसून काचेच्या खिडकीतून बाहेर बघू लागला.

कॉफी संपताच एक खोल श्वास घेत त्याने सामानाची आवराआवर केली आणि लाऊंजमधून बाहेर पडला. मुंबई-कोची फ्लाईटची अनाउन्समेंट होताच उदयन पुढच्या प्रवासासाठी निघाला. कोची एयरपोर्टवर जॉश गाडी घेऊन आला होता. कोचीवरुन इडक्कूला पोहचायला रात्रीचे अकरा वाजले. गाडीत त्याची बऱ्यापैकी झोप झाली होती. हॉटेलवर पोहचताच त्याने मुंबई आर्ट गॅलरीच्या स्टोरीचे रिपोर्टस तयार करायला घेतले. काम करता करता रात्रीचा एक वाजला, त्याचे डोळे पेंगले. नेहमीप्रमाणे झोपतांना पापणीवर वाट बघत असलेल्या आठवणी धावत आल्या आणि त्यांचा पिंगा सुरु झाला. उदयनला सवय झाली असली तरी सोबत प्रश्न घेऊन आलेल्या आठवणींनी तो अस्वस्थ व्हायचा आणि उत्तरांच्या शोधात कड बदलत झोपायचा प्रयत्न करायचा. पहाटे पहाटे केव्हा तरी डोळा लागायचा.

उदयन सकाळी उठला तेव्हा प्रवासाचा शीण उतरला होता. नवा दिवस नवीन जागा. इडक्कूच्या निसर्गरम्य वातावरणात नवीन स्टोरी करायला तो उत्सुक होता. तेवढ्यात त्याच्या असिस्टंटचा फोन आला आणि त्याचं म्हणणं ऐकून उदयन जाम वैतागला. खरं तर परमिशन, लोकेशन आणि इतर तयारीसाठी स्टाफ त्याच्या खूप आधी पोहचला होता. मात्र मंगलादेवी मंदिरासाठी लागणारी फॉरेस्ट रेंजरची परमिशन त्याच्यापर्यंत अजून पोहचली नव्हती. म्हणजेच या स्टोरीसाठी उशीर होणार होता. यावर तोडगा काढणारा एकमेव व्यक्ती म्हणजे जॉश. जॉश, ड्रायवर कम लोकल गाईड कम मॅनेजर हा "ट्रॅव्हलर्स" मॅगझीनच्या पे रोलवर होता. मुंबई ऑफिसमध्ये तीनचारदा येऊन गेला होता. मुख्य म्हणजे तो राघवचा खास माणूस होता.

"जॉश, यार चेक इन टू धिस मॅटर. व्हाय इज इट गेटिंग डिले? रिव्हर्ट एज सुन एज पॉसिबल. आय डोन्ट वॉन्ट टू हॅम्पर एट लीस्ट टूमारोस् शेड्यूल." उदयन जरासा चिडून म्हणाला

"यस सर." जॉश

"आय वील ड्रॉप यू समव्हेअर !" जॉश

"नो. थँक्स. वील ब्रीद सम फ्रेश एयर." उदयन

"एक बात पूछना था ।" जॉश

"बोलो" उदयन

"सर, हॉटेल कैसा है? आपके क्रयू को तो अच्छा लगा।" जॉश

"अच्छा है। रेस्टॉरन्ट, इंटेरियर और टिपिकल साऊथ इंडियन फुड सब अच्छा हैं। थोडा महंगा है। पर कंपनीने बुक किया तो बहोत अच्छा हैं." उदयन हसत म्हणाला

"और सर आपके स्पेसिफिकेशनस् के अनुसार है ना...." जॉश

"हाँ....." म्हणत उदयन हलकेच हसला

"आय नो सर, यू डोन्ट लाईक वेस्ट ऑफ टाईम एन्ड यू ऑलवेज फॉलो बिझी शेड्युल. एन्जॉय फोटो शूट. कॉल मी इफ यू नीड एनीथिंग." जॉश

"श्युअर..." उदयन

या संभाषणाने उदयनचा वैताग निवळला असला तरी बिनसलेल्या वेळापत्रकामुळे वेळेची अशी पोकळी तयार झाली की तो अस्वस्थ होत असे. कॅमेरा गळ्यात अडकवत, कॅप-गॉगल चढवत जिप्सीचं दार खचकन ओढत उदयन हिरवळीवरुन नदीच्या कडेने चालू लागला. पेरियार अभयारण्याची डॉक्यूमेंटरी करण्यात व्यस्त झाल्यावर त्याला असा निवांत वेळ मिळणार नव्हता. यापेक्षा महत्वाचं म्हणजे भास-आभासाच्या खेळांनी त्याच्या मनाचा आणि विचारांचा ताबा घेण्याआधी त्याला कामात झोकून द्यायचे होते. हिरव्यागार निसर्गाचे भराभर स्नॅप्स काढत उदयन नदीच्या काठाने पुढे पुढे जात होता. इतके फोटो काढून सुद्धा त्याचं समाधान झालं नव्हतं. "आय वॉन्ट टू कॅप्चर सम विलेज काईंड ऑफ अ थिंग. समथिंग रुरल....समथिंग देसी... ऑर से एसेन्स ऑफ धिस हेवन." तो स्वत:शीच पुटपुटत होता.

"क्या मांगता है साब? देसी?" जवळून जात असलेल्या एका अन्नाने विचारलं

"अरे! कुछ नही, मैं फोटो की बात कर रहा था।" उदयनने हसत उत्तर दिलं

"नरीयल पानी पी लो साब। वो सामने में अपना घर है।" अन्ना

"यहींके हो?" उदयनने विचारले

"हां साब, लोन्नपन नाम मेरा।" अन्नाने स्टूल पुढे करत उत्तर दिलं

नारळ पाणी पिता पिता उदयनचं लक्ष भिंतीवरील फोटो कडे गेलं.

"मेरा बेटा, विजेन्द्र।" लोन्नपन

"क्या हुआ था?" उदयन

"जानकर क्या करोगे? तुम जैसा आके...बड़ी बड़ी बातें करके चला जाता हैं और लौट के नही आता।" संध्या, लोन्नपनची बायको बाहेर येत म्हणाली

"चुप बैठ। ये साब मदत को नही आया। यहाँ से गुजर रहा था, मैने रोका पानी के लिए।" लोन्नपनने तिला दाटत म्हणाला

"जा अंदर, काम कर अपना" लोन्नपन रागात म्हणाला

"धिस इज इट...आय जस्ट वॉन्ट टू क्लीक ट्रॅडिशनल समथिंग लाइक धिस." उदयन कॅमेरा सेट करता करता पुटपुटला

"गरीब  का घर साब....खास नही कुछ।" लोन्नपन

"संध्या खिंचने नही देगी साब। रहने दो। ऐसी यहाँ कई जगह मिल जायेगी।" लोन्नपन

"क्यूं नही खिचने देगी?" उदयन

"जबसे हमारा ये लड़का उस एक्सीडेंटमें गया, तब से वो ऐसी ही है। बाहर से आनेवालों से ठीक से बात नहीं करती। छोड़ो ना साब, तीस रुपये दो और जाओ।" लोन्नपन हात जोडत म्हणाला

"पता नही मैं क्या कर सकता हूं पर जानना चाहूंगा क्या हुआ था?" उदयनने सॅकमधून डायरी पेन काढत विचारलं

"ये स्टोरी कितने को बताया मैं....आपको भी बताता हूं." लोन्नपन

"मत्स्यकन्या, ये नया बोट फेरी के लिये तयार हुआ था। विजेन्द्र, मेरा बेटा उस नये बोटपर काम के लिये चक्कर काट रहा था। वहाँ राजेन्द्र को, मेरे दूर के भाई के लड़के को काम मिला था। बेटा उससे मिलने जाता था काम के चक्कर में। जिस दिन बोट का पहला फेरी था उस दिन राजेन्द्र का तब्येत ठीक नही था तो उसने विजेन्द्र को बोटपर काम के लिए बुला लिया।" लोन्नपन

बोलता बोलता त्याचा गळा भरुन आला. त्या क्षणी त्याला आठवलं राघवने "थेककड़ी बोट डिजास्टरच्या" स्टोरीवर काम केलं होतं. अनेक पर्यटक, खास करून विदेशी पर्यटक बुडून मेल्यामुळे त्या घटनेला खूप प्रसिद्धी मिळाली होती. राघव अनेक दिवस इथेच ठाण मांडून बसला होता. पण पॉलिटिकल प्रेशरमुळे डिटेल रिपोर्ट छापल्या गेला नव्हता. वरवरच्या बातम्या बरेच दिवस पेपरमध्ये झळकत होत्या.

"सुना था मैनें उस के बारे में...." उदयन राघवला मेसेज करता करता म्हणाला.

"बहोत दिन तक चला था सर्च ऑपरेशन। ये विजेंद्र की बॉड़ी कोची से नेवी के लोग आये उन्हे मिली थी। पुरे चार दिन बाद।" लोन्नपनच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते.

उदयनचे डोळे पाणावलेले बघून तो परत बोलू लागला.

"बोट छोड़ा था तब मैं उधरइच अपना सफाई का काम कर रहा था। दोपहर को साडेचार के आसपास बोट छोड़ा था। आधे घंटे में मैं काम खतम कर के घर को निकला था, तब जोर जोर से चिल्लाने की आवाज आई। हमारे सामने बोट पलट गई। मेरी जिंदगी मेरे सामने खतम हो गई।" लोन्नपन

"किसीने मदत नहीं की क्या?" उदयन

"बहोत आया। झूठा आंसू बहाया। फोटो खिंचा और चला गया।" संध्या कोरड्या आवाजात म्हणाली

"जलानेका सामान देकर, हातमें हजार रुपये थमा दिया। इत्तेसे जिंदगीका गुजरा होगा क्या?" लोन्नपन

"शुरु शुरु मे राशन भेजा कुछ संस्थाने। बादमें दो किलो चांवलके लिये मरे हुएको कितनी बार मारना पड़ा।" संध्या

"वो पेरियार नदीकी गोदमें खेलकर बड़ा हुआ, उसीकी गोदमे समा गया।" लोन्नपन

हे ऐकल्यावर सुन्न झालेल्या उदयनची तिथले फोटो काढायची हिम्मत झाली नाही. त्याने कॅमेरा गळ्यात अडकवला, टेबलवर १००ची नोट ठेवली.

"छुट्टा नही ना साब।" लोन्नपन

"कल सुबह नरियल पानी पिने आऊंगा तब दे देना।" लोन्नपन सुट्टे पैसे खिशात शोधू लागताच उदयन म्हणाला

"चलो साब उस मोड़ तक साथ में चलता हूं। मुझे व्हीनस मॅडम के घर जाना है। गरीब बच्चों के लिये इस घर को स्कूल बनाना है। भली मॅडम है। गरीब बच्चों को मुफ्त में पढ़ाती है। उसका घर छोटा है। सोचता हूं मेरा घर दे दूं इस काम के लिये।" लोन्नपन

"फिर तुम कहाँ रहोगे?" उदयन

"हमारा क्या साब...आज है, कल नही।" लोन्नपन हसत म्हणाला

"कल आऊंगा, पक्का ।" म्हणत उदयन पुढे निघाला असला तरी त्याला काहीतरी जाणवलं

काय माणूस आहे हा? स्वत:ला दोन वेळेस पुरेसे अन्न मिळेना आणि गरीब मुलांना शिकायला घर देतो म्हणतो. उदयनने मागे वळून बघितले तर लोन्नपन निघून गेला होता. अंधार व्हायच्या आत काही स्नॅप्स घ्यायच्या विचारात असलेला उदयन 'गावातील माणसांचे चेहरे काही बोलतात का? ' याच्या शोधात निघाला. हिरव्याकंच निसर्गात दडलेलं वास्तव त्याच्या कॅमेऱ्याचे लेन्स भराभर टिपत होते. कोणाच्या डोळ्यात उत्सुकता तर कोण्याच्या चालण्यातील निराशा, कधी भरलेल्या वास्तूतील भयाण शांतता, रस्त्यावर खेळणारी अर्ध्या चड्डीतली अर्धी उघडी बेफिकीर पोरं, ओसरीवर बसून कुजबुज करणाऱ्या तरुण पोरी, सुरकुतलेल्या हातांनी वाळवण वेचणारी आजी, असे अनेक अनुभव तो टिपत असला तरी लोन्नपनचा आणि संध्याचा चेहरा सारखा डोळ्यापुढे येत होता.

जॉशला फोन करुन त्याने गणपती मंदिराजवळ बोलवले. त्याला यायला अर्धा तास होता. मंदिराच्या पायरीवर बसून तो कॅमेरा चेक करत असतांना एक म्हातारा काठी टेकवत तिथे येऊन बसला. मंदिराकडे पाठ करून अधे मधे काहीतरी पुटपुटत होता. भाषा कळत नसली

तरी हावभावावरुन वैतागलेला वाटत होता. उदयनने मंदिराकडे वळून बघितलं, कळसाला टेकलेला केशरी सूर्य आणि पायरीवर बसलेला तो म्हातारा, त्याने उठून भराभर फोटो काढले. तेवढ्यात नुकतीच मिशी फुटलेला पोरगा त्याला न्यायला आला, म्हाताऱ्याने जातांना मंदिराकडे कटाक्ष टाकला, त्या बोथट नजरेत कसलीच खंत नव्हती, विश्वास नव्हता, आशा नव्हती, अपेक्षा नव्हती. तो आयुष्यात एक तर संपूर्ण भरलेला असावा नाही तर पूर्ण रिकामा. त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यातील अर्थशून्यता त्याला उगाच अस्वस्थ करुन गेली. हीच अर्थशून्यता लोन्नपनच्या डोळ्यात त्याने पाहिली होती. गाडीत बसता बसता उदयनने मोबाईल चेक केला. राघवने त्याचा मेसेज चेक केला नव्हता. गाडीच्या खिडकीतून आयुष्याचे अजून काही बोलके चित्र वाटेत सापडतात का, या आशेने तो बाहेर बघू लागला.

हॉटेलला पोहचल्यावर लगेच वाफाळलेली फिल्टर कॉफी घेऊन थकलेल्या उदयनने जेवणाची ऑर्डर दिली. रुममध्ये येऊन कॅमेरा लॅपटॉपला कनेक्टकरुन आजच्या टिपलेल्या क्षणांची उजळणी करत असतांना राघवचा फोन आला.

"हॅलो, राघव. व्हॉट्स अप यार. तू आहेस तरी कुठे?" उदयन

"अरे यार. राइट नाओ आय एम  स्टक अप इन नक्स्लाईट शिट." राघव

"उद्या इथून चंद्रपुर आणि तिथून बसने हैद्राबाद. तिथले काम आटपून नंतर मुंबई" राघव

"तू बोल. तू कुठेस मित्रा?" राघव

"पेरियार नॅशनल पार्कवर डॉक्यूमेंटरी करायला आलो आहे." उदयन

"वन इनसिडन्ट रिमाईंड मी यूअर स्टोरी ऑन थेककडी बोट डिजास्टर. सो पिंग्ड यू. नथिंग अर्जंट. क्यूरिअस टू नो सम फॅक्टस. दॅट्स ऑल." उदयन

"इंटरनल पॉलिटिक्स अजून काय? त्या मत्स्यकन्या बोट डिजास्टरवर मी दिलेला रिपोर्ट पब्लिश केला नाही. माझ्याच रिपोर्टमध्ये चेंजेसकरुन मॅनेजमेंट्ने एक मोघम रिपोर्ट पब्लिश केला. "ट्रॅव्हलर्स" मधला तो रिपोर्ट वाचल्यावर मला लक्षात आलं होतं. यावर मी मॅनेजमेन्टला मेल केला होता. त्यांना वरून प्रेशर होतं. तुला तर माहिती या गोष्टी, मी या भानगडीत पडलो नाही. नंतर दिड-दोन महिने मी म्यानमारला होतो....त्यामुळे वेळ मिळाला नाही. नेहमीचा मंत्र ..तेरी भी चुप मेरी भी चुप..." राघव

"ओके. कॉपी असेल तर पाठव." उदयन

"श्युअर. मेल करतो थोड्या वेळात." राघव

उदयनने फोनवर थोडक्यात राघवला लोन्नपनची कथा सांगितली.

"तुला रिपोर्ट वाचल्यावर लक्षात येईल सर्व. तो कोण म्हणालास...लोन्नपन त्याच्यासारखे अजून असतील. रिपोर्ट वाचल्यावर कळेल तुला." राघव

उदयनचं जेवण झालं. दिवसभराचे फोटो सेव्ह करुन ठेवले. दुसऱ्या दिवशीसाठी कॅमेरा तयार करुन ठेवला.

रात्रीचे दहा वाजले तरी राघवची मेल आली नव्हती. तो रूमच्या टेरेसवर आला. सिगरेट पेटवत तो लोन्नपनबद्दल विचार करु लागला. त्याचा विचार डोक्यातून जाता जात नव्हता. एका भीषण अपघाताचा तो बळी होता. त्याचं तरुण पोर काळाने हिरावून घेतलं होतं. त्याला तो फारफार तर काही पैसे देऊन मदत करु शकत होता. त्याच्यासाठी काय करता येईल या

विचारात तो गुंग होता. तेवढ्यात त्याच्या मोबाईलवर नोटिफिकेशनची बेल वाजली. राघवचा मेल आला होता. त्याला रिपोर्ट वाचायची घाई झाली होती. रिपोर्ट वाचता वाचता त्याला झोप आली असली तरी मनातील आठवणींची गर्दी डोळे मिटू देईना. पहाटे पहाटे केव्हा तरी डोळा लागला. जॉशच्या फोनने जाग आली तेव्हा घड्याळ्यात सकाळचे आठ वाजले होते.

"आधे घंटे में रेस्टॉरंट में मिलो।" उदयन

"यस सर।" जॉश

"चलो, नाश्ता कर लो। आज का दिन बिझी रहेगा।" उदयन

"यस सर, दस बजे तक परमिशन आ जायेगा।" जॉश

"ग्रेट! बाकी के लोग?" उदयन

"अभी नाश्ता करके निकले सब आपको ये शेड्युल देने को कहा है।" जॉश त्याच्या हातात कागद देत म्हणाला

उदयनने मंगलादेवीचे डिटेल्स चेक केले. स्क्रिप्ट वाचली. फोटोशूट आणि रेकॉर्डिंगच्या शेड्यूलवर नजर टाकली.

"जॉश, क्रयू को बोल दो सेटअप तयार रखें। मैं ट्रस्टीस् के इंटरव्यू लेकर उनसे मंदिर में मिलता हूँ।" सांगत उदयन निघाला

ठरल्याप्रमाणे मंगलादेवीच्या स्टोरीचं काम आटोपलं. लंचनंतर त्याने दोन तीन तास त्या स्टोरीवर काम केलं. क्र्यू मेंबर्सला त्या स्टोरीबद्दल टिप्स देत त्याने जॉशला जीप काढायला सांगितली. मंदिरापर्यंतचा संपूर्ण रस्ता हिरव्या सौंदर्याने नटला होता. उदयन मात्र लोन्नपन आणि संध्याच्या विचारत मग्न होता.

"बस बस, यहीं रोक दो ।" उदयननी लोन्नपनच्या घराच्या थोडं आधी गाडी थांबवायला सांगितली.

"कल पिक किया वही आ जाऊँ सर?" जॉश

"चलेगा, फोन करता हूँ ।" उदयन गाडीचं दार लावत म्हणाला

"नारियल पानी मिलेगा क्या?" पडवीत कोणी दिसलं नाही म्हणून उदयनने जोरात आवाज दिला.

"लोन्नपन, संध्या........" उदयनने परत जोरात आवाज दिला

कालपेक्षा आज तिथे जरा जास्त भयाण वाटत होतं. पडवीच्या आत आणि बाहेर पानांचा पाचोळा साठला होता. त्याने एक नजर पाण्याच्या टाकीकडे टाकली. तिथेही सर्वत्र शेवाळ पसरलं होतं. उदयनने त्या घराच्या चारीकडून चक्कर टाकली. भकास झालेल्या त्या वास्तुकडे तो आश्चर्याने बघतच होता. त्याला येऊन पाच- सात मिनटे झाली असतील, हे दोघं कुठे गेले

असावेत. काल निघतांना त्याने आज यायचं कबूल केलं होतं. विजेंद्रचा फोटो बघायला तो पडवीत गेला तेवढ्यात त्याला शंभर रुपयाची नोट पडवीत पडलेली दिसली.

"यहाँ क्या देख रहे हो साब." त्याला संभ्रमात बघून तिथून जाणाऱ्या एका व्यक्तीने सायकलवरुन उतरत विचारलं

"लोन्नपन...संध्या... उन्हे खोज रहा था." उदयन

"मै लोन्नपन का पड़ोसी। क्या साब? वो दोनो कबके गुजर गये।" देवनाथ

"**क्या**?" उदयनने आश्चर्याने विचारले

"दोनों ने जान दे दी। उनका बेटा अचानक गुजर गया\ बादमें हालत बहुत खराब। क्या करते? ..." देवनाथ बरंचसं काही सांगत होता. पण उदयनचे कान बंद झाले होते.

उदयन अचंभित होता. त्याला काहीच कळत नव्हतं. तो त्या ओसाड वास्तुकडे विस्मयाने बघत होता. काल जे घडलं ते काय होतं? काल नेमकं आपल्याला काय जाणवलं हे उदयनच्या आज लक्षात आलं. आयुष्याच्या प्रवासात अजून एक भास आभासाचा खेळ त्याची वाट बघत होता. आपण किती पळालो तरी कुठल्या न कुठल्या वळणावर हे भास आपल्याला गाठतात...आपली यातून सुटका नाही.

"आप कौन लगते है उनके? यँहा कैसे आये?" देवनाथच्या या प्रश्नाने तो भानावर आला.

त्याची अचंभित अवस्था बघून देवनाथनी त्याला समोरच्या पारावर बसवलं. कालचा प्रसंग देवनाथला सांगावा की नाही या विचारात तो होता. सांगितला तर तो कसा विश्वास ठेवणार?

"सालों से कोई नही आया इस विरान मकान में। उनके जो रिश्तेदार है वो कोची और उसके आसपास रहते है। तुम कैसे जानता है उनको? क्या लगते हो उनके? इन्शूरन्सवाले हो क्या?" देवनाथ

"नही, नही, वो थेककडी बोट डिजास्टर के स्टोरीपर काम कर रहा था। विक्टीम लिस्ट में इनके लड़के का नाम था..." उदयन

"वो तो पुरानी बात हो गयी। हां जिनके घर के लोग गये वो अभी भी सदमेमें हैं।" देवनाथ

"वैसे ये लोन्नपन बहूत सनकी था। रिश्तेदार भी कम ही आते थे। वो राजेन्द्र और विजेन्द्र साथ में पढ़े थे तो बस वही जाना आना होता था उनका" देवनाथ

"उससे तो हम पड़ोसी भी बात करने से कतराते थे।" देवनाथ

हे ऐकून उदयन उठला आणि दोघंही तिथून निघाले. देवनाथ सांगत होता तो ऐकत होता.

"चलो साब, मेरा दुकान आ गया।" बस स्टँडजवळ येताच देवनाथ थांबला

उदयनने जॉशला फोन करुन बसस्टँडजवळ बोलवले. राघवला फोन केला.

"हॅलो... बोल उदय" राघव

"रिपोर्ट्स वाचलेत. मला आपल्या रेकॉर्डमध्ये असलेली विक्टिम्सची लिस्ट लागेल." उदयन

उदयनने त्याला लोन्नपनबद्दल सांगितलं. ते ऐकून राघव स्तब्ध झाला.

अर्ध्या तासात राघवचा परत फोन आला.

"उदयन, मी तुला काही विडिओज पाठवतो. लोन्नपन..... पुसटसं आठवतं आहे. त्याची स्टोरी आम्ही रेकॉर्ड केली होती. डाटाबेसमध्ये चेक करतो. असेल तर पाठवतो." राघव

"उदयन, स्वत:ची काळजी घे. या पूर्वी भास-आभासाची अशी प्रचिती तुझ्या आयुष्यात अनेकदा आली आहे. हे काय आहे ते कोडं एकदा सुटलं पाहिजे. कोणाला तरी दाखव. एखाद्या ..... ... एखाद्या सायकियाट्रिस्टला वगैरे." राघव

"हो रे. तेच कळत नाही. हल्ली मला भेटतात ती माणसं खरी कोणती, भास कोणते हा फरक करणंही कठीण झालं आहे रें. कोणाशी बोलताना अचानक मनात येतं ' हा जिवंत तर असेल ना?'... कसला भयंकर खेळ चालू अहे काही काही कळतच नाही यार. आता या खेळात माझी भुमिका काय याचाच विचार करतो आहे." उदयन

"टेक केअर. आणि हो! जॉशला माझ्याशी बोलायला सांग." राघव

"सांगतो." उदयन

जॉशची वाट बघता बघता उदयनच्या मनात विचार आला, तो पेरियार नॅशनल पार्कवर स्टोरी करायला आला आणि एका पूर्वीच्या या अपघाताच्या एका कथेत कसा काय अडकला? या घटनाक्रमाशी त्याचा काय संबंध असेल? या विचारात तो आठवायचा प्रयत्न करु लागला.

# मत्स्यकन्या : २

पेरियार नॅशनल पार्क आणि मंगलादेवी मंदिराची स्टोरी पूर्ण झाली होती. लोन्नपन्न केस काय? हे जाणून घेण्यासाठी उदयनने मॅनेजमेन्टकडून तीन-चार दिवसांचा मुक्काम वाढवून घेतला. अर्थात चार महिन्यांनी त्यांच्या कंपनीचे फोटोग्राफीच्या प्रदर्शन होणार होते त्यासाठी लागणाऱ्या फोटोशूटसाठी ही लोकेशन उत्तम आहे याचं आमीष त्याला त्याच्या बॉसला द्यावं लागलं. या बोनस मिळालेल्या तीनचार दिवसात त्याला लोन्नपन केसचा छडा लावायचा होता. यासाठी त्याला राघवची मदत लागणार होती. हातात फक्त ऐकीव माहिती होती आणि राघवचे काही स्टॅटस्टिक्स. विक्टिम लिस्टने सुरवात करायची ठरवून उदयन कामाला लागला. लोकल कॉर्पोरेशनमधून याबद्दल माहिती मिळवणं कठिण होतं. फार फार तर विक्टिम लिस्ट क्रॉसचेक करता आली असती. त्यावेळेच्या स्थानिक बातम्या आणि त्यासंबधी प्रकाशित लेख यांच्या मदतीने थोडीफार माहिती मिळण्याची आशा होती. लोन्नपन केसवर कसं फोकस करता येईल याचा विचार करत असतांना त्याला राघवचा मेल मिळाला. त्यात बरेचसे विडिओ होते. त्यात लोन्नपनचा विडिओ सापडला.

त्याला भेटलेला लोन्नपन आणि त्याच्या बाजूला डोळे टिपणारी संध्या विडिओत बघून उदयन चरकलाच आणि या केसचा छडा लावायचा त्याचा आवेश एका क्षणात विरला. त्याला नक्की काय घडत आहे आणि आपल्या सोबतच का? हे प्रश्न त्रस्त करत होते. एका दमात पाणी पिऊन तो परत कामाला लागला. त्याने परत परत लोन्नपनच्या इंटरव्यूचा विडिओ बघितला. त्याचा संताप त्या विडिओवरुन त्याच्या लक्षात येत होता. तोच घटनाक्रम, तेच विवरण, तेच वर्णन....मग लोन्नपन किंवा त्याचा आत्मा त्याला भेटण्यामागचा उद्देश काय? लक्षात येत नव्हतं. आणि ही काही पहिलीच वेळ नव्हती. उदयनच्या आयुष्यात अशा मृत व्यक्तींनी अनेकदा वावर केला होता. गप्पा मारल्या होत्या...

प्रिय वाचक

उदयनचे पुढे काय झाले? मृत लोन्नपन आणि संध्या त्यालाच का भेटले? हे नक्की काय गूढ होते. त्याला मृत व्यक्ती का भेटत? त्याची पाळंमुळं अखेर बिहारपर्यंत कशी पोचली. आणि उदयन त्यांच्यापर्यंत कसा पोहोचला? उदयनच्या आयुष्यातलं हे पारूषण होतं तरी काय?

उदयनला जसे या कुतुहलाने घेरले तसेच तुम्हालाही घेरले असणार. पुस्तकाच्या पुढील पानांतून हे गूढ अत्यंत कलात्मकरित्या उलगडत जाणार आहे. त्याची उकल समजून घेण्यात तुम्हाला आनंद मिळेल याची खात्री देतो.

पुस्तकाच्या सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे हे पुस्तक विनामूल्य नाही. पुस्तकाची किंमत फ़क्त रु. २१ आहे. ही किंमत खालील अकाउंट्सवर भरून 7218350078 या क्रमांकावर Whats app करा. तुम्हाला पुढील लिंक आणि पासवर्ड मिळतील. त्यांचा वापर करून तुम्ही हे पुस्तक पूर्ण वाचू शकता व आपल्या संग्रही ठेवूही शकता.

1. Vinita Shreekant Deshpande
   Account No. 064200100014237
   IFSC Code: SRCB 0000064
   MICR Code: 411088009
   The Saraswat Co-operative Bank Ltd, Akurdi Branch, Pune
2. Amazon pay, Google pay, PhonePe, Paytm (Mobile number) 7218350078
3. Amazon Pay upi: 7218350078@apl
4. BHIM upi: 7218350078@upi
5. Google pay upi: atharvadeshpande45@okaxis
6. PhonePe upi: 7218350078@ybl

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parushan_vinita_deshpande_full-protected.pdf

Ask to Scan this QR to Accept Money

**To Pay Atharva Shreekant Deshpande**

SCAN QR USING PAYTM

PhonePe

ACCEPTED HERE

Scan & Pay Using PhonePe App

or Pay to Mobile Number using PhonePe App

7218350078

Atharva D

© 2020, All rights reserved, PhonePe Internet Pvt. Ltd.

atharvadeshpande45@okaxis

Atharva Deshpande

atharvadeshpande45@gmail.com

+91 72183 50078

Scan my code to pay

Open code scanner